SPPL

**आजचे घरकुल, करील भविष्य उज्ज्वल !**

# शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

## महाराष्ट्र शासनाच्या संपूर्ण मालकीची कंपनी

## ६ वा वार्षिक अहवाल
## सन २००४ - २००५

# शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

## संचालक मंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **श्री. पृथ्वीराज चव्हाण** | : | माननीय मुख्यमंत्री व अध्यक्ष शिपुप्रम.<br>(गृहनिर्माण मंत्री पदभार असल्याने) |
| २. | **श्री. सचिन अहिर** | : | माननीय राज्यमंत्री, गृहनिर्माण व उपाध्यक्ष, शिपुप्रम. |
| ३. | **श्री. गौतम चटर्जी, भाप्रसे** | : | प्रधान सचिव, गृहनिर्माण व व्यवस्थापकीय संचालक, शिपुप्रम. |
| ४. | **श्री. राहूल अस्थाना, भाप्रसे** | : | महानगर आयुक्त, मुं. म. क्षे. वि. प्रा. व संचालक, शिपुप्रम. |
| ५. | **श्री. टी. सी. बेंजामिन, भाप्रसे** | : | प्रधान सचिव, नगरविकास विभाग व संचालक, शिपुप्रम. |
| ६. | **श्री. सुधिर श्रीवास्तव, भाप्रसे** | : | प्रधान सचिव, वित्त, व संचालक, शिपुप्रम. |
| ७. | **श्री. सतिश एम. गवई, भाप्रसे** | : | उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अभियंता, म्हाडा व<br>संचालक, शिपुप्रम. |
| ८. | **श्री. एस. एस. झेंडें, भाप्रसे** | : | मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण व<br>संचालक, शिपुप्रम. |
| ९. | **श्री. आर. के. खन्ना** | : | कार्यकारी अधिकारी, हुडको व संचालक, शिपुप्रम. |

| | | |
|---|---|---|
| **श्री. एस. बी. म्हात्रे** | : | कंपनी सचिव व महाव्यवस्थापक, वित्त |
| **अंतर्गत लेखापरिक्षक** | : | मे. के. एस. संघवी आणि कंपनी, सनदी लेखापाल. |
| **साविधानिक लेखापरिक्षक** | : | मे. एम. बी. अग्ररवाल आणि कंपनी, सनदी लेखापाल. |
| **बँकर्स** | : | बँक ऑफ महाराष्ट्र, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१. |
| **नोंदणीकृत कार्यालय** | : | गृहनिर्माण भवन, ५ वा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१. |

# शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

## सभासदांना सूचना

आपणांस सूचना देण्यात येत आहे की **शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित (शिपुप्रम)** ची स्थगित **सहावी वार्षिक सर्वसाधारण सभा** सोमवार दिनांक १८ जून २०१२ रोजी सायंकाळी ठिक ४.३० वाजता सह्याद्री गेस्ट हाउस सभागृह, मलबार हिल, मुंबई - ४०००३६ येथे खालील कामकाजाकरिता होणार आहे.

कंपनीच्या ३१ मार्च २००५ रोजी संपलेल्या सहाव्या वार्षिक कालावधीचे लेखे, संचालक मंडळाचा अहवाल, सांविधानिक लेखापरिक्षकांचा समभागधारकाना अहवाल व भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षकांची भाष्यके व त्यावरचे कंपनीचे अभिप्राय याना स्वीकृत व मान्यता देणे.

**टिप** :- ज्या सभासदाला सभेला हजर राहण्याचा व मत देण्याचा अधिकार आहे त्याला / तिला स्वत: ऐवजी दुस-या व्यक्तिस सभेस हजर राहण्याचा व मत देण्याचा अधिकार आहे व अशी व्यक्ती कंपनीचा समभागधारक असण्याची गरज नाही. प्रतिपत्र अर्ज सोबत दिला आहे.

**शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या**
संचालक मंडळाच्या आदेशानुसार

स्थळ - मुंबई
दिनांक - १८ जुन २०१२.

कंपनी सचिव व महाव्यवस्थापक (वित्त)

# संचालक मंडळाचा अहवाल

शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या (शिपुप्रलि) १ एप्रिल, २००४ ते ३१ मार्च, २००५ पर्यंतच्या १२ महिन्यांचा सहाव्या कालावधीचा सहावा अहवाल सादर करण्यात शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या संचालक मंडळाला आनंद होत आहे.

सुरुवातीसच संचालक मंडळ समभाग धारकांना कळवू इच्छिते की, हा अहवाल सादर करण्यास फारच विलंब झालेला आहे विविध कारणांमुळे अगदी सुरुवातीपासून या कामास लेखा विवरणपत्र तयार करणे, लेखा परीक्षण व संचालक मंडळाच्या अहवालास तयार करण्याच्या आणि ते सादर करण्याच्या प्रक्रियेला विलंब होत आलेला आहे. तथापि, व्यवस्थापनाने महालेखापाल कार्यालय (वाणिज्यिक लेखापरीक्षा- महाराष्ट्र) यांच्या साहाय्याने ही प्रक्रिया मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला आहे. महालेखापाल कार्यालयाने ३/४ वर्षांचे प्रलंबित अहवाल की जे सामान्यपणे प्रत्येक वर्षासाठी स्वतंत्रपणे अंतिम रूप देण्याच्या प्रक्रियेपासून ते एकाचवेळी एकामागोमाग सादरीकरण करण्यासाठी आम्हाला साहाय्य केलेले आहे. त्याप्रमाणे आजच सहाव्या (स्थगित) वार्षिक सर्वसाधारण सभेबरोबर सातवी, आठवी व नववी या स्थगित वार्षिक सर्वसाधारण सभासुद्धा एकामागोमाग एक घेण्यात येत आहेत म्हणून अनुक्रमे २००४-०५ ते २००७-०८ (४ वर्षे) या चार वित्तीय वर्षांसाठी लेखापरीक्षित लेख्याचे विवरणपत्र, लेखापरीक्षकांचे अहवाल, संचालक मंडळाचे अहवाल आणि भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांची अंतिम भाष्ये ही सर्वसाधारण सभेसमोर मांडण्यात येत आहेत आणि त्यानंतर ती विधानमंडळ पटलावर मांडण्यात येतील.

दिनांक ४ ऑक्टोबर, २०१० रोजी बोलावण्यात आलेल्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये दि.२० मे, २०१० रोजी संचालक मंडळाच्या लेखापरीक्षण समितीच्या पाचव्या बैठकीमध्ये दिलेल्या शिफारशींनुसार ३१ मार्च, २००५, २००६, २००७, व २००८ रोजी संपलेल्या चार वर्षांच्या लेखा विवरणपत्रांना मान्यता देण्यात आली होती व ते स्वीकृत करण्यात आले होते. त्यानंतर, महालेखापाल (वाणिज्यिक लेखापरीक्षा- महाराष्ट्र) यांच्या लेखापरीक्षा चमूने संपूर्ण चार वर्षांच्या लेखापरीक्षित लेखा विवरणपत्रांची तपासणी केली होती. महालेखापाल (वाणिज्यिक लेखापरीक्षा- महाराष्ट्र) यांनी २००४-०५ या आढाव्याअंतर्गत त्यांच्या १२ जानेवारी, २०११ च्या पत्राद्वारे त्या वर्षासाठी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांची भाष्यके सादर केली आहेत.

शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित याची स्थापना मुंबईमधील नागरी क्षेत्रांमध्ये झोपडपट्टी विकास व पुनर्वसन कार्यक्रम हाती घेणे आणि पुनर्वसन कार्यक्रमाचा वेग वाढविणे या प्राथमिक उद्दिष्टांसह करण्यात आली आहे आणि प्रथमत: विकासक ह्या भूमिकेतून रुपये ४६७ कोटी इतक्या एकूण भांडवली खर्चाचा समावेश असणारी १११ इमारतींमध्ये १०,६७३ घरे उभारण्याच्या १० योजना हाती घेण्यात आल्या आणि झोपडपट्टी पुनर्वसन कार्यक्रमांना वेग देण्याच्या दृष्टीने शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजनांअंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या खाजगी विकासकांना वित्तीय अडचणीमुळे खोळंबून राहिलेल्या तीस झोपडपटटी पुनर्वसन योजनाना १४,८०९ सदनिका बांधकाम करण्याकरिता वित्तीय साहाय्य रुपये ५३६.१० कोटी इतक्या रकमेचे कर्ज सहाय्य मंजूर केले होते.

दिनांक ३१ मार्च, २००५ रोजी, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांनी विकासक म्हणून हाती घेतलेल्या प्रकल्पावर रुपये ३१६.५३ कोटी इतका भांडवली खर्च केला होता आणि खाजगी विकासकांना रुपये ७३.८५ कोटी इतक्या कर्ज रकमेचे वाटप ऑक्टोबर, १९९९ पर्यंत केले होते परंतु कंपनीच्या प्रशासकीय गृहनिर्माण विभागाच्या निदेशांनुसार नंतर ते कर्ज वाटप बंद करण्यात आले. उक्त कर्जाची एप्रिल, २००७ पर्यंत पूर्णपणे वसुली झाली होती.

**आढाव्या अंतर्गत सहाव्या कालावधीकरिता (एप्रिल २००४ ते मार्च, २००५) संक्षिप्त कामगिरीचे परिणाम खाली दर्शविले आहेत.** **(रुपये लक्षामध्ये)**

| **तपशील** | **आढावाधिन कालावधी २००४-०५** | **मागील वर्ष (२००३-०४)** |
|---|---|---|
| एकूण उत्पन्न | १५८२.०१ | १९५९.५० |
| नफा / (तोटा) : व्याज (बँक आकार सहित) पूर्वी | २५.६० | १०२६.५४ |
| वजा / (अधिक) व्याज | ३५९.२० | ९०.५९ |
| नफा / (तोटा) घसारा आणि करपूर्व | (३३३.६०) | ९३५.९५ |
| वजा : घसारा | १८.७७ | १८.१० |
| करपूर्व नफा | (३५२.३८) | ९१७.८५ |
| वजा पूर्वीच्या कालावधीचा खर्च | --- | ०.८४ |
| करपूर्व नफा | (३५२.३८) | ९१७.०१ |
| कर तरतूद (किमान पर्यायी कर + विलंबित कर दायित्व) | ५८.७१ | ५६४.०१ |
| **करोत्तर निव्वळ नफा/ (तोटा)** | **(४११.०९)** | **३५३.००** |
| **संचयित तोटा** | **४३३५.२७** | **३९२४.१९** |

**लाभांश :**

संचयित तोट्यामुळे लाभांश देता येऊ शकत नाही.

**चालू कामकाज :**

चालू प्रकल्पांसाठी ३० जून, २०११ पर्यंत रुपये ४४५ कोटी इतका एकूण खर्च झाला आहे. अँटॉप हिल, वडाळा, शिवप्रसाद को. ऑप. हौसिंग सोसायटी शिवडी, धारावी येथील संक्रमण शिबिर, मिलिंद नगर, धारावी, माटुंगा कामगार शिबिर-धारावी, दिंडोशी, मालाड या सात योजना आणि धारावी येथील खाजगी विकासकाबरोबरची एक योजना पूर्ण झाली आहे आणि घरांचे वाटपदेखील झालेले आहे. राहुल नगर, तुर्भे-मंडाले आणि शेड कॉम्प्लेक्स येथील योजना बव्हंशी पूर्ण झाल्या आहेत. तुर्भे-मंडाले (१ इमारत) राहूल नगर (३ इमारती) आणि शेड कॉम्प्लेक्स (४ इमारती) येथील या योजनांतर्गत अल्प स्वरपातील उर्वरित कामे पूर्ण होत आहेत. तुर्भे मंडाले येथील झोपडीधारकांच्या स्थलांतराची प्रक्रिया जोरात सुरु आहे. तथापि, त्याला ३६.६० मीटरच्या विकास योजनेतर्गत पोच मार्गाला काही झोपडयांमधून अडथळे निर्माण झाले आहेत. या पोच मार्गामुळे पाणीपुरवठा, मल नि:सारण इत्यादी बाह्य पायाभूत सुविधा कामाचे बांधकाम सुकर होऊ शकते. माटुंगा लेबर कॅम्प प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे आणि झोपडपट्टीवासियांना तसेच विक्रीघटक घरांचे वाटप पूर्ण झाले आहे. परंतु विकास नियंत्रण नियमावली ३३ (१०) चे परिशिष्ट चारच्या खंड क्रमांक ३.११ व ३.१९ अंतर्गत या योजनेस आवश्यक प्रकल्प म्हणून ही योजना घोषित करण्याच्या निर्णयाच्या अभावी योजनेतील बदलामुळे हस्तांतरणीय विकास हक्क मिळण्याची शक्यता आहे त्यासाठी लगतचा खेळाच्या मैदानाचा भूखंड रिकामा करणे आवश्यक आहे आणि तसे झाल्यावर या भूखंडावर बाधित झोपडपटटीवासियांचे पुनर्वसन सुकर होईल.

गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णयानुसार राहूल नगर प्रकल्पातील इमारत क्रमांक १ (विक्रीजन्य) याचे वाटप रफी अहमद किडवाई मार्ग पोलीस स्टेशनकरिता १२ सदनिका आणि उर्वरित ९६ सदनिका पोलीस कर्मचारीवर्गाला निवासव्यवस्थेसाठी पोलीस विभागास देण्यात आल्या आहेत आणि सदर सदनिका २०१० च्या मुद्रांक शुल्क सिद्धगणक दर आधारित रुपये ७१,५००/- प्रति चौरस मीटर म्हणजेच एकूण रक्कम रुपये ४२.३० कोटी इतक्या रकमेने उपलब्ध करून दिल्या आहेत त्यामध्ये कंपनीला आतापर्यंत रुपये २१.३० कोटी इतकी महसुल प्राप्त झाला आहे.

शिवाय, कपंनी राहूलनगर व शेड कॉम्प्लेक्स प्रकल्पातील उर्वरित विक्रीजन्य सदनिकांची विक्री करण्याचे योजीत आहे. तुर्भे मंडाले, मानखुर्द व माटुंगा लेबर कॅम्प येथील प्रकल्पांमधील उर्वरित प्राप्त हस्तांतरणीय विकास हक्क यांच्या विक्रीमधून सुद्धा मोठी प्राप्ती होईल.

## भविष्यकालीन दृष्टिकोन :

आरंभी हाती घेतलेले प्रकल्प कंपनीने बहुतेक पूर्ण केलेले असून उर्वरित घरांचे वाटप / विक्री देखील येत्या काही महिन्यांत पूर्ण होईल. आढाव्याअंतर्गत २००४-०५ या वर्षासाठी रुपये ४.११ कोटी इतका तोटा झाला आहे आणि २००५-०६ या वर्षात पुन्हा रुपये २.१७ कोटी इतका तोटा झाला तथापि, २००६-०७ आणि २००७-०८ या वर्षात अनुक्रमे रुपये १४.२६ कोटी व ५६.३२ कोटी नफा झाला आणि यामुळे रुपये ३१.२६ कोटी इतका संचयित तोटा भरून निघाला आहे आणि रुपये २५.०५ कोटी इतक्या रकमेचा निव्वळ नफा झाला आहे. त्यामुळे शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितचे ३१ मार्च, २००७ रोजीचे निव्वळ मूल्य र ८३.७४ कोटी इतक्या रकमेवरून ३१ मार्च, २००८ रोजी रुपये १४०.०५ कोटी रकमेपर्यंत पोहोचले आहे. २००८-०९ मध्ये पुन्हा रुपये २.८१ कोटी इतक्या रकमेचा मामुली तोटा झाला परंतु पुन्हा २००९-१० मध्ये रुपये ३.७१ कोटी आणि २०१०-११ मध्ये रुपये ५२.८० कोटी इतका नफा झाला आहे.

वित्तीय विवरणपत्रे जेव्हा तोटा दाखवित होते तेव्हा ते काही चालू प्रकल्पांवर होउ शकणा-या तोटयाकरिता तरतुदी केल्यामुळे झाला होता संबंधित वर्ष अखेरीस सर्वांगिण परिस्थितीचा विचार करता असे वाटले की, संबंधित वर्ष अखेरीस ती परिस्थिती तशीच राहीली तर तोटा होईल. हे तोटे मात्र प्रत्यक्ष रोख स्वरूपातील तोटे नसून म्हणजेच कंपनीने प्राप्त महसुलापेक्षा अधिक प्रत्यक्ष खर्च केला म्हणून नव्हे भारतीय सनदी लेखापाल संस्थेद्वारे बांधकाम उद्योगाकरिता विहित केलेले लेखांकन मानक -७ अंतर्गत शक्य वाटणा-या तोटयांकरिता त्वरीत तरतूद करणे आवश्यक आहे. आयकर अधिनियम, १९६१ न्वये भारतीय सनदी लेखापाल संस्थेद्वारे प्रसृत केलेल्या लेखांकन मानकांचे काटेकोरपणे पालन करणे विहित आहे.

कंपनीने सुरु केलेल्या प्रकल्प कामात सुरुवातीला वित्तीय अडचणी, कंत्राटदारांचा असहकार आणि सक्षम संरचना व्यवस्थेचा अभाव इत्यादी अडचणींशी अथक प्रयत्नाने सामना करून बहुतेक प्रकल्प पूर्ण झाले आहेत. निधीची परिस्थिती उशिरा का होईना हळुहळू सुधारत गेल्याने आत्मविश्वास बळावला आहे आणि केवळ सुरुवातीचेच प्रकल्प स्वबळावर पूर्ण करण्यात येतीलच परंतु नवीन प्रकल्प सुध्दा हाती घेण्यासाठी पुरेशा निधीची तरतूद होईल.

पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार प्रसृत सागरी पुनर्विकास क्षेत्र धोरण मार्गदर्शक तत्त्वांवरील परिपत्रक दिनांक ६ जानेवारी, २०११ मध्ये, कंपनीचा समावेश सागरी पुनर्विकास क्षेत्रामध्ये झोपडपट्टी विकास आणि पुनर्वसन उपक्रम हाती घेण्याकरिता राज्य शासकीय अभिकरण म्हणून करण्यात आला आहे आणि त्यानुसार, या सागरी पुनर्विकास प्रकल्पासाठी खाजगी विकासकांशी संयुक्तपणे सहभागी होण्याचा प्रयत्न कंपनी करीत आहे. तसेच झोपडपट्टी पुनर्विकासासाठी आणि आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी

आणि कमी किंमतीच्या घरांसाठी नवीन योजना  घेण्याचे योजीत आहे. कंपनी ज्या उद्देशासाठी स्थापन करण्यात आली आहे त्या सेवेकरिता नजिकच्या काळात पूर्णपणे कार्यरत होईल याबाबत संचालक मंडळ आशावादी आहेत.

**वित्तव्यवस्था :-**

महाराष्ट्र शासनाने कंपनी स्थापन झाल्यानंतर अल्पावधीतच रुपये ११५ कोटी इतके भाग भांडवलाच्या रुपात वित्तीय साहाय्य कंपनीला दिले होते. त्यांनतर मात्र शासनाकडून कुठलेही भागभांडवल किंवा कर्जे प्राप्त झाली नव्हती. त्यामुळे शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितने हाती घेतलेल्या प्रकल्पांना वित्त पुरवठा होण्याकरिता शासकीय हमीच्या बदल्यात हुडकोकडून सन २००० मध्ये रुपये ५८.७२ कोटी आणि सन २००३ मध्ये रुपये २० कोटी)  इतके मुदत कर्ज घेण्यात आले.

सदर प्रकल्पांना वित्तपुरवठा होण्याकरिता कंपनीने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून प्रत्येक वर्षी नविनीकरणीय प्रमाणे रुपये १० कोटी इतक्या रकमेच्या ठेवीचा देखील लाभ घेतला. तसेच दिंडोशी व तुर्भे मंडाले येथील दोन झोपडपट्टी पुनर्वसन योजनांसाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाबरोबर संयुक्त उद्यम करार केला होता. ही व्यवस्था नंतर, या दोन प्रकल्पांच्या कंत्राटदारांनी असहकार चालू ठेवल्यामुळे सोडून देण्यात आली होती. कंपनीने प्रसंगावशात हुडको आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांकडून घेतलेल्या संपूर्ण कर्जांची नंतर परतफेड केली. कंपनीने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाशी केलेल्या संयुक्त उद्यम कराराअंतर्गत घेतलेल्या रुपये ९.४१ कोटी इतक्या संपूर्ण रकमेची परतफेड देखील केली.

सन २०१०-११ या पर्यंत कंपनीला हस्तांतरणीय विकास हक्कांच्या एकूण विक्रीद्वारे रुपये १९८.९३ कोटी इतकी किंमत मिळाली. सार्वजनिक प्रकल्प अंमलबजावणी अभिकरणांना प्रकल्पग्रस्तांसाठीच्या सदनिकांचे वाटप केल्यामुळे प्रशासनिक खर्च या नावे रुपये १६३.५२ कोटी इतका महसूल प्राप्त झाला आणि घरांच्या विक्रीद्वारे रुपये १४४.१४ कोटी इतकी रक्कम मिळाली. शिवाय, चालू प्रकल्प पूर्ण केल्यानंतर संभाव्य सुमारे रुपये २०० कोटी इतकी रक्कम प्राप्त होईल यामुळे नवीन प्रकल्प हाती घेण्यासाठी कंपनीला चांगल्या संधी मिळतील. कंपनीच्या निधीची स्थिती सध्या सुस्थितीत रुपये १५०.०० कोटी इतकी आहे जी विविध राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये दीर्घ मुदत ठेवी म्हणून ठेवण्यात आली आहे.

**नियत ठेवी :**

कंपनीने कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत कलम ५८ क आणि कंपनी (ठेवींची स्वीकृती व नवीकरण) नियम, १९७५ च्या तरतुदींच्या आधारे कोणत्याही नियत ठेवी जनतेकडून स्वीकारलेल्या नाहीत.

**संचालक :**

शिपुप्रम कंपनीची स्थापना दि.२५.९.१९९८ च्या शासन निर्णयानुसार, झाली त्यात संचालक मंडळाची संरचना नमूद केली आहे ज्याद्वारे नमूद विवक्षित पदधारक शिपुप्रम कंपनीचे पदसिद्ध संचालक होतात. संस्थापन नियमावलीतील कलम ८६ व ८७ न्वये संचालक मंडळातील एकतृतीयांश सदस्य व्यवस्थापकीय संचालक / पूर्ण वेळ / नामनिर्देशित / ऋणपत्रे संचालक वगळता हे परिक्रमाने निवृत्त होण्यास व ते पुनर्नेमणुकीस पात्र आहेत अशी जरी तरतूद असली तरी तथापि शिपुप्रम ही महाराष्ट्र शासनाची पूर्णपणे मालकीची कंपनी असून कंपनी अधिनियम, १९५६ च्या कलम २५५ अन्वये पूर्वोक्त संचालकांची निवृत्ती / पुनर्नियुक्ती या तरतुदी अशा कंपन्यांना बंधनकारक नाहीत. म्हणून कोणताही संचालक परिक्रमाने निवृत्त होणार नाही.

संस्थापनेच्या वेळी, श्री.जी. एस. गिल, भाप्रसे यांनी पूर्णवेळ व्यवस्थापकीय संचालकाचे पद धारण केले होते. तथापि, मार्च, १९९९ मध्ये त्यांची बदली झाल्यानंतर, महाराष्ट्र शासनाच्या निर्देशांनुसार, तत्कालीन प्रधान सचिव, गृहनिर्माण, महाराष्ट्र शासन यांनी

शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित, व्यवस्थापकीय संचालक पदाचा अतिरिक्त पदभार धारण केला आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित सह व्यवस्थापकीय संचालक पदाचा अतिरिक्त पदभार धारण केला. ही प्रथा त्यांनतर चालू राहीली.

संस्थापनाच्या कालावधीपासून आतापर्यंत, विनिर्दिष्ट पदधारण करणाऱ्या व्यक्ती शिपुप्रलि कंपनीचे पदसिद्ध संचालक झाले आहेत त्यांनी अत्यंत उपयुक्त व मौलिक अंशदान कंपनीस दिले आहे व संचालक मंडळ त्यांच्या या फलदायी व कंपनीच्या हितकारी योगदानाबद्दल कृतज्ञेने नोंद घेत आहे.

विचाराधीन कालावधीमध्ये, संचालक मंडळाच्या तीन बैठका संपन्न झाल्या व या बैठकीना बहुतांश संचालक उपस्थित होते.

## लेखापरीक्षा समिती :

कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत कलम २९२ क मधील तरतदींनुसार, सप्टेंबर, २००३ मध्ये संचालक मंडळाने पुढील सदस्याची लेखापरीण समिती घटित केली आहे.

१. **महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण** व संचालक - शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

२. **प्रधान सचिव, नगर विकास** व संचालक - शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

३. **प्रधान सचिव, वित्त विभाग** व संचालक - शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

४. **उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण** व संचालक - शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

५. **प्रधान सचिव, गृहनिर्माण व** व्यवस्थापकीय संचालक - शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित
**मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वर्सन प्राधिकरण व सह व्यवस्थापकीय** संचालक - शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित - स्थायी आमंत्रित

## लेखापरिक्षण समितीच्या विचारार्थ खालील विषयसूची असेल.

अ) वार्षिक व दीर्घकालीन अंदाजपत्रक / वित्तीय योजना मंजूर करणे व ह्या अंदाजपत्रक / वित्तीय योजनांच्या अंमलबजावणीचा तिमाही / सहामाही आढावा घेणे.

ब) शिपुप्रमच्या प्रमुख कार्यव्यवहाराच्या अंतर्गत नियंत्रण पद्धतीचा आढावा घेणे.

क) अंतर्गत व संविधानिक लेखापरिक्षकांसाठी लेखापरिक्षणाचे नियोजन करणे व अंतर्गत व सांविधानिक लेखापरिक्षकांच्या अहवालांचा आढावा घेणे.

ड) संचालक मंडळाला इष्ट वाटतील अशा बाबींवर संचालक मंडळाला माहिती व सल्ला देणे.

## संचालकांच्या जबाबदारी विषयक विवरण

संचालक दृढपूर्वक ग्वाही देतात की,

१) वार्षिक लेखे तयार करताना लागू असणा-या विहीत लेखा मानकांचे अनुपालन करण्यात आले असून त्यामध्ये महत्वपूर्ण असे विचलन करण्यात आले नाही.

२) लेखांकन धोरणाचे सुसंगत अनुपालन करण्यात आले आहे व ३१ मार्च, २००५ रोजी संपन्न वर्षात कंपनी कामकाज स्थिती

तसेच त्या दिवशी संपलेल्या वर्षाचाप्राप्त परिणाम खरा व योग्य आहे असे प्रस्तुत करण्यासाठी संचालकांनी सुजाणपणे व उचित निर्णय प्रक्रिया व अंदाजपद्धती अवलंबविली आहे.

३) कंपनी अधिनियम, १९५६ मधील तरतूदीनुसार योग्य लेखा नोंदी ठेवण्यासाठी उचित व पुरेशी काळजी घेण्यात आली असून त्याद्वारे कंपनीच्या मालमत्तेची सुरक्षितता जपण्यासाठी व लबाड्या व अनियमितता रोखण्याची काळजी घेण्यात आली आहे.

४) कंपनीचे कामकाज अव्याहतपणे चालू राहील अशी धारणा ठेवून लेखे तयार करण्यात आले आहेत.

## लेखापरीक्षक

मेसर्स एम. बी. अग्रवाल आणि कंपनी, सनदी लेखापाल, मुंबई यांची सन २००४-२००५ ते सन २००७-०८ या वर्षांकरिता सांविधिक लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तदनुसार त्यांनी विचाारधीन वर्षाच्या लेख्याचे लेखापरीक्षण केले आहे.

## कर्मचारीवृंद :

कंपनी अधिनियम, १९५६ आणि कंपनी (कर्मचाऱ्यांचे तपशील) नियम, १९७५ तरतुदींनुसार कर्मचारीवृंदातील कोणत्याही सदस्याला विहित मर्यादेपेक्षा अधिक मोबदला दिला नसल्याने ही माहिती जोडणे आवश्यक नाही.

## इतर माहिती

कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत कलम २१७ १(ई) आणि कंपनी (संचालक मंडळ अहवालांमधील माहिती विवरण) नियम, १९८८ नुसार, आपल्या संचालकांचे असे म्हणणे आहे की, शिपुप्रलिच्या कामकाजाच्या स्वरूपाच्या दृष्टीने पुढील बाबतीत माहिती सादर करणे आवश्यक नाही.

(अ) ऊर्जा बचत संरक्षण आणि

(ब) तंत्रज्ञान समावेशन

कंपनीची परकीय चलनातील प्राप्ती व खर्च विचाराधीन काळात निरंक होता.

## अभिस्विकृती

सचालक मंडळ, अत्यंत कृतज्ञतेने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, महाराष्ट्र शासन, बँका, हुडको ग्राहक आणि सहयोगी यांच्याकडून मिळालेल्या सहकार्य व पाठबळ यांची अभिस्विकृती करत आहे आणि कंपनीवर आत्मविश्वास व्यक्त केल्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार मानत आहे.

कर्मचाऱ्यांनी त्यांची कर्तव्ये कार्यासक्तीने आणि परिणामकारकपणे पार पाडल्याबद्दल संचालक मंडळ त्यांची प्रशंसा करत आहे.

**शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांच्या**
**संचालक मंडळाकरिता व त्यांच्या वतीने**

स्थळ : मुंबई

दिनांक : ४ ऑक्टोबर, २०१०

व्यवस्थापकीय संचालक / अध्यक्ष

# एम. बी. अग्रवाल ॲन्ड कंपनी

**सनदी लेखापाल**

२०४ म्हात्रे पेन बिल्डिंग, सेनापती बापट मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०२८.
दूरध्वनी क्रमांक:- ४०२९८२८१ फॅक्स : ९१-२२-२४३६३३१२
इमेल :- mbaandco @ yahoo.co.in


## लेखापरीक्षकांचा अहवाल

प्रति,

**मा. सभासद सदस्य,**
शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित,
मुंबई

आम्ही शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित चा सोबत जोडलेला ताळेबंद, नफा व तोटा लेखा आणि निधी स्त्रोत विवरण यांचे लेखापरीक्षण केले आहे. या वित्तीय विवरणपत्रांसाठी कंपनीचे व्यवस्थापन जबाबदार आहे. आमच्या लेखापरीक्षणावर आधारीत या वित्तीय विवरणपत्रांवर मत स्पष्ट करणे ही आमची जबाबदारी आहे.

१. भारतामध्ये सर्वसाधारणपणे अवलंबन करीत असलेल्या लेखांकन मानकांनुसार आम्ही लेखापरीक्षण केले आहे. या मानकांप्रमाणे असे विहीत आहे की लेखापरिक्षणाचे नियोजन व योजन असे असावे ज्यायोगे आम्हास अशी खात्री व्हावयास पाहिजे की लेखा विवरण पत्रे ही निखालय असत्य कथन करत नाहीत. लेखापरीक्षणामध्ये चाचण्यांवर आधारित तपासणी करणे, रकमांचा शहानिशा करणे आणि वित्तीय विवरणपत्रांमध्ये ते दर्शविणे या गोष्टींचा समावेश होतो. लेखापरीक्षेणा मध्ये व्यवस्थापनेने योजलेली लेखांकन तत्त्वे आणि करण्यात आलेली महत्त्वाची प्रकटने त्याचप्रमाणे सर्वंकष वित्तीय विवरणपत्र सादरीकरणाचे मूल्यमापन व त्यांच्या निर्धारणाचादेखील समावेश आहे. आम्हाला विश्वास वाटतो की, आमच्या लेखापरीक्षेणा मध्ये आमच्या मताला वाजवी आधार आहे.

२. कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत कलम २२७ पोटकलम (४ क) च्या अनुषंगे, भारत सरकारव्दारा जारी कंपनी (लेखापरीक्षकांचा अहवाल) आदेश, २००४ द्वारे विहीत केल्याप्रमाणे, उक्तआदेशाच्या परिच्छेद ४ व ५ विनिर्दिष्ट बाबींवरील निवेदन आम्ही जोडपत्रामध्ये दिले आहे.

३. **आम्ही पुढीलबाबींवर लक्ष वेधत आहोत:**

(अ) विविध विकासक व कंत्राटदार, म्हाडा, हुडको आणि इतर किरकोळ देय रकमा व प्राप्त रकमा आणि बँका (अनुसूची क्यू, मधील परिच्छेद ९ मध्ये दर्शविल्याप्रमाणे) यांच्यासंबंधात येणे बाकी असलेल्या रकमा स्थायीकरण आणि मेळ यांच्या अधीन आहेत. लेख्यांवरील त्यांचा परिणाम निश्चित करावा लागेल.

(ब) निलंबन खात्यामधील जमा शिल्लक रूपये १०,७९४/- या रकमेचे तपशील उपलब्ध झालेले नाहीत.

(क) देय रक्मावरील सेवा करावर मूलस्त्रोत्राव्दारे करकपात करण्यात आलेली नाही.

(ड) वर्षाच्या शेवटी चालू असलेल्या बांधकामापैकी १.५६ कोटी इतक्या रक्कमेचा विविध प्रकल्पांवर झालेला खर्च आस्थागित ठेवण्यात आला आहे. कंपनीने जर उक्त खर्च निर्लेखित केला असता तर तोटा त्या रकमेने जास्त झाला असता.

(इ) ताळेबंदचा दि.३१.३.२००५ आणि संचालक मंडळाने वित्तीय विवरणपत्रांना मान्यता दिल्याचा दिनांक यांमधील काळाच्या लक्षणीय फरकाच्या दृष्टीने उक्त कालावधी दरम्यान उद्‌भवलेल्या महत्वाच्या घटना व त्यांचा वित्तीय विवरणपत्रावर झालेल्या परिणाम शोधून काढणे शक्य झालेले नाही म्हणून त्याप्रमाणात लेखांकन मानक ४- “आकस्मिक खर्च आणि घटना” याचे पालन कंपनीने केलेले नाही.

(फ) अनुसूची क्यू मध्ये नमूद केलेल्या लेखांकन धोरणांनुसार, कर्जावरील निधीचा प्रत्यक्ष विनियोग आणि प्रकल्पाची स्थिती हे लक्षात न घेता, प्रत्येक प्रकल्पाच्या प्रारंभिक शिल्लकीच्या आधारे विविध चालू प्रकल्पांमध्ये ऋणासाठीचा खर्चाचे संविभाजन करण्यात आले आहे. योग्य तपशील आणि माहिती अभावी हे धोरण लेखांकन मानक १६ शी सुसंगत नाही याचा निश्चित परिणाम लेख्यांवर काय झाला आहे कळून येत नाही. शेड कॉम्प्लेक्स प्रकल्प आणि माटुंगा लेबर कॅम्प या प्रकल्पावर कोणतेही व्याज आकारण्यात आले नाही.

(ग) लेखांकन मानक -२८ मत्तांची हानी याचे अनुपालन न करणे.

**४. वर निर्दिष्ट केलेल्या जोडपत्रासह आम्ही असेही नमूद कर इच्छितो की.-**

(१) वरील परिच्छेद ३ मध्ये नमूद केलेल्या बाबी व्यतिरिक्त, आमच्या लेखापरीक्षणच्या प्रयोजनांकरिता आमच्या माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे आवश्यक अशी सर्व माहिती आणि स्पष्टीकरणे आम्ही मिळविली आहे.

(२) आमच्या मते, आम्ही नोंदी दुरस्तकांची तपासणी केली असता असे दिसून आले की, कंपनीने अधिनियमा अंतर्गत नोंदी पुस्तके ठेवलेली आहेत परंतु नोंदी प्रमाणकांना योग्य क्रमवारी दिलेली नव्हती आणि लेख्या पुस्तकामधील नोंदी प्रमाणकांच्या संदर्भ क्रमांकाशी ते जुळत नाहीत.

(३) या अहवालाशी संबंधित असलेले ताळेबंद, नफा व तोटा पत्रक आणि निधी स्त्रोत विवरणपत्र लेखा पुस्तकाशी जुळत आहेत.

(४) आमच्या मते, या अहवालाशी संबंधित असलेले ताळेबंद, नफा व तोटा पत्रक आणि निधी स्त्रोत विवरणपत्र बाबी पूर्वोक्त परिच्छेद इ मधील बाबी वगळता कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत कलम २११ च्या पोटकलम (३क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या लेखांकन मानकांचे अनुपालन करीत आहे.

(५) कंपनी अधिनियम, १९५६ अंर्तगत कलम २७४ च्या पोटकलम (१) च्या खंड (ग) अंर्तगत वित्त मंत्रालय (कंपनी व्यवहार विभाग) यांनी काढलेली अधिसूचना जीएसआर ८२९ (ई) दिनांक २१ ऑक्टोबर, २००३ शासकीय कंपनीला लागू होत नाही.

(६) आमच्या मते आणि आमच्या आश्वासित माहिती प्रमाणे व आम्हाला देण्यात आलेल्या स्पष्टीकरणांनुसार, वरील परिच्छेद ३ मध्ये नमूद केलेल्या बाबींच्या अधीन राहून, उक्त लेखे, कंपनी अधिनियम, १९५६ मधील तरतुदीनुसार विहीत माहिती देतात आणि सर्वसाधारणपणे भारतात अवलंब करीत असलेल्या लेखांकन तत्त्वांशी सुसंगत खरी व रास्त स्थिती दर्शवितात.

(अ) दिनांक ३१ मार्च, २००५ रोजीच्या कंपनीच्या आर्थिक स्थिती दर्शक ताळेबंदच्या बाबतीत;

(ब) त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाकरिता नफा व तोटा पत्रकातील तोटयाच्या बाबतीत आणि

(क) त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाकरिता निधी स्त्रोत विववरणा बाबतीत

(७) दीर्घकालीन कंत्राटकामे व हाती घेतलेल्या प्रकल्पांच्या वा वित्तीय सहाय्य केलेल्या प्रकल्पांबाबत (टिप्पणी क्र १ (फ) व ७ (ब) ) महसूलाबाबत व्यवस्थापनाने प्रकल्प पूर्ण टक्केवारी व त्यासाठीचा झालेला खर्च या बाबतीत बांधलेल्या अंदाजावर विसंबून राहिलो आहेत कारण या बाबी तांत्रिक ज्ञानाशी निगडीत आहेत.

**एम. बी. अग्रवाल ॲन्ड कंपनी यांच्याकरिता,**
**सनदी लेखापाल**
**फर्म क्र. १००१३७ डब्ल्यू**

**स्थळ : मुंबई** **भागीदर**
**दिनांक : ४ ऑक्टोबर, २०१०** **सदस्यत्व क्रमांक : ४८२२९**

# लेखापरीक्षकाच्या अहवालास जोडपत्र

**(लेखापरिक्षकांच्या सम दिनांकाच्या अहवालातील परिच्छेद क्र. ३ च्या अनुषंगे )**

**१)**

(अ) कंपनीने स्थिर मत्तांचे तपशील व स्थान दर्शविणारे योग्य नोंदी ठेवलेल्या आहेत.

(ब) व्यवस्थापनाने वर्षभरात स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही.

(क) कंपनीने वर्षभरात स्थिर मत्तांच्या कोणत्याही महत्वाच्या घटकांची विल्हेवाट लावलेली नाही.

२)

(अ) कंपनी कोणताही तयार माल साठा, सुटे भाग आणि कच्चा माल ठेवत नाही म्हणून त्यांचा प्रत्यक्ष पडताळणीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(ब) विविध ठिकाणी काम चालू प्रकल्पासंदर्भात आमच्या मते, कंपनीचे कार्यक्षेत्र आणि त्यांच्या स्वरूपाच्या अनुषंगे, व्यवस्थापनाने अवलंबिलेल्या पडताळणीच्या कार्यपद्धतीचे अनुसरण हे वाजवी व पुरेसे आहे.

(क) कंपनीने वस्तूसुचीचा योग्य अभिलेख ठेवला आहे. पडताळणीनंतर दिसून आलेल्या प्रत्यक्ष वस्तूसूची आणि अभिलेख यांच्यामधील विसंगती या महत्वाच्या नव्हत्या.

३)

(अ) कंपनी अधिनियमाच्या कलम ३०१ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीमध्ये समावेश असलेल्या कंपन्यांना, भागीदारी संस्थांना किंवा इतर पक्षकारांना कंपनीने कोणतेही प्रतिभूत वा अप्रतिभूत कर्ज मंजूर केलेले नाही.

(ब) आम्हाला देण्यात आलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यांनुसार, कंपनीने कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत कलम ३०१ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीमध्ये समावेश असलेल्या कंपन्यांकडून, भागीदारी संस्थांकडून किंवा इतर पक्षकारांकडून कोणतेही प्रतिभूत किंवा अप्रतिभूत कर्ज घेतलेलं नाही.

४) आमच्या मते आणि आम्हाला देण्यात आलेली माहिती व स्पष्टीकरणे यांनुसार आणि वस्तुसूची, स्थिर मत्ता यांच्या खरेदी आणि मालाची विक्री यासंबंधात, कंपनीच्या कार्यक्षेत्राचे स्वरूप आणि कंपनीच्या आकारमानाशी अनुरूप पुरेशी अंतर्गत नियंत्रण व्यवस्था आहे. आमच्या लेखापरीक्षणाच्या कालावधीत, अंतर्गत नियंत्रणामध्ये महत्वाच्या सततचा अभाव वा सुधारणा करण्यासाठी कोणतीही कसुरी असलेली आम्हाला दिसून आली नाही किंवा आम्हाला तसे कळविण्यात देखील आली नाही.

५) आम्हाला देण्यात आलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणांनुसार, कंपनी अधिनियम, १९५६ अंर्तगत कलम ३०१ अन्वये, ठेवलेल्या नोंदवहीमध्ये कोणत्याही आवश्यक व्यवहारांची नोंद करण्याची राहून गेली नाही.

६) कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत कलम ५८ अ व ५८ अअ आणि कंपनी (नियत ठेवी स्वीकार) नियम, १९७५ अंर्तगत कंपनीने कोणत्याही सार्वजनिक ठेवी स्वीकारलेल्या नाहीत.

७) आमच्या मते, कंपनीकडे कंपनीचा कार्यक्षेत्र आवाका आणि स्वरूपानुसार कसलीही योग्य अंतर्गत लेखापरीक्षण व्यवस्था नाही आणि अंतर्गत नियंत्रण व्यवस्थेचे संनियंत्रण होत नाही व त्यादष्टीने या संदर्भात वर्षभरात योग्यरीत्या आढावा घेतला जात नाही.

८) आम्हाला देण्यात आलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार, कंपनी अधिनियम,१९५६ अंर्तगत कलम २०९ (१) (घ) अन्वये, केंद्र सरकारने कंपनीसाठी परिव्यय अभिलेखांचे नोंदीकरण विहित केलेले नाही.

९) शासकीय सांविधिक मंडळ म्हाडा कडून प्रतिनियुक्तिवर असलेल्या कर्मचा-याच्या बाबतीत भविष्य निर्वाह निधी (सीपीएफ), सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीसाठी कंपनीचे अंशदान तसेच कर्मचा-याकडून अंशदायी भविष्य निर्वाह निधी व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीचे अंशदान म्हाडाकडे देण्यात येत आहे. तथापि, संबंधित अधिनियमामध्ये विहित केलेल्या दिनांकाप्रमाणे शासनाला उक्त प्रथन केल्याचे म्हाडाकडून पुष्टी प्राप्त होत नाही म्हणून, संबधित प्राधिकरणांमध्ये अंशदायी भविष्य निर्वाह निधी /सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीचे वेळेवर दिल्याबाबतची पुष्टी करणे आम्हाला शक्य झाले नाही.

१०) (अ) आम्हाला देण्यात आलेली माहिती व स्पष्टीकरणांनुसार, आयकर, संपत्ती कर, विक्री कर, सीमा शुल्क आणि उत्पादन शुल्क यासंबंधातील कोणत्याही विवादास्पद देय रकमा देय दिनांकापासून सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधीकरिता दिनांक ३१ मार्च, २००५ रोजी प्रलंबित नाहीत.

**(ब) जमा न केलेल्या आयकर, संपत्ती कर, विक्रीकर, सीमा शुल्क, उत्पादन शुल्क आणि उपकर संबधी देय असलेल्या पण विवादास्पद रकमांसंबंधीची माहिती आणि स्पष्टीकरणे आम्हाला देण्यात आलेली नाहीत.**

१०) वित्तीय वर्ष अखेरीस एकूण तोटा हा निव्वळ मूल्याच्या पन्नास टक्क्यांहून कमी आहे. आमच्या लेखापरीक्षणामध्ये समाविष्ट असलेला वित्तीय वर्षातील तोटा रोखीच्या स्वरपात आहे. परंतु, लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षात तसा झालेला नाही.

**११) कंपनीने हुडकोच्या देय रकमांची परतफेड करण्यास कसूर केली आहे. दिनांक ३१.३.२००५ रोजीची थकित कर्ज हप्ते रक्कम आणि थकित व्याजाची रक्कम या संबधित तपशील आम्हाला देण्यात आलेला नाही.**

१२) कंपनीने समभाग, ऋणपत्रे आणि इतर प्रतिभूती यांच्या आधारावर कोणतीही प्रतिभूत कर्जे किंवा आगाऊ रकमा मंजूर केलेली नाहीत.

१३) चिटफंड /निधी/म्युच्युअल लाभ निधी/ संस्था यांच्याशी निगडीत संविधाच्या तरतुदी कंपनीला लागू नाहीत.

१४) कंपनी समभाग, प्रतिभूती, ऋणपत्रे आणि इतर गुंतवणुका यांच्या विनीमय किंवा व्यापारात नाही.

(१५) आम्हाला देण्यात आलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यांनुसार आणि आम्ही तपासणी केलेल्या अभिलेखानुसार कंपनीने कोणत्याही बँकांना किंवा वित्तीय संस्थांना कोणत्याही अन्य पक्षाच्या वतीने कोणतीही हमी दिलेली नाही.

१६) आमच्या मते ज्या प्रयोजनासाठी मुदत कर्जे घेतली आहेत त्यासाठी त्यांच्या विनियोग केला आहे.

(१७) आम्हाला देण्यात आलेली माहिती व स्पष्टीकरणे यांनुसार आणि कंपनीच्या ताळेबंदाची संपूर्णपणे तपासणी केल्यावर, आम्ही असा अहवाल देतो की, अल्प मुदतीसाठी उभारलेल्या निधीचा वापर दीर्घ मुदतीच्या गुंतवणुकींमध्ये करण्यात आला नाही.

१८) कंपनीने कंपनी अधिनियमाच्या कलम ३०१ अन्वये नोंदवहीमध्ये समावेश असणाऱ्या पक्षकारांना समभागांचे कोणतेही खास बाब पध्दतीने वाटप केलेले नाही.

१९) लेखापरीक्षणानुसार कंपनीने वर्षभरात कोणतीही ऋणपत्रे जारी केलेली नाहीत.

२०) लेखापरीक्षणानुसार कंपनीने वर्षभरात समभागाचे सार्वजनिक वाटप केले नाही.

(२१) आम्हाला देण्यात आलेली माहिती व स्पष्टीकरणे यांनुसार, आमच्या लेखापरीक्षणादरम्यान कंपनीने किंवा कंपनीला कोणतीही लबाडी झाल्याचे आमच्या निदर्शनास आले नाही.

**एम. बी. अग्रवाल ॲन्ड कंपनी यांच्याकरिता,**
**सनदी लेखापाल**
**फर्म क्र. १००१३७ डब्ल्यू**

**स्थळ : मुंबई** **भागीदर**
**दिनांक : ४ ऑक्टोबर, २०१०** **सदस्यत्व क्रमांक : ४८२२९**

# शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

## ३१ मार्च २००५ चा ताळेबंद

| तपशिल | परिशिष्ट | चालू वर्ष | चालू वर्ष | मागील वर्ष |
|---|---|---|---|---|
| **निधीचे स्त्रोत** | अे | | | |
| भाग भांडवल | | | १,१५,००,००,८०० | १,१५,००,००,८०० |
| **कर्जे** | बी | | | |
| प्रतिभूत कर्ज | | | २३,०४,९९,७७५ | २६,३२,४३,५४५ |
| अप्रतिभूत कर्ज | | | १०,००,००,००० | १०,००,००,००० |
| | | | **१४८,०५,००,५७५** | **१५१,३२,४४,३४५** |
| **निधीचा विनीयोग** | | | | |
| **स्थिर मत्ता** | सी | | | |
| ठोकळ मुल्य | | ३,७५,०५,८५२ | | ३,६९,०१,५९८ |
| उणे घसारा | | **१,०३,१३,६६१** | | ८१,७८,४६६ |
| | | | **२,७१,९२,१९१** | **२,८७,२३,१३२** |
| **चालू मत्ता, कर्जे व अग्रिम** | | | | |
| चालू असलेली कामे | डी | १०१,११,४६,७४६ | | १०६,२७,९३,५३५ |
| संक्रीण ऋणको | इ | १५,६३,४२,७५३ | | १५,७९,८७,३०० |
| बँकमधील रोख रक्कम अनुसूचित बँक | एफ | ४,२५,९८,६२१ | | ३,०४,२७,७३५ |
| कर्जे व अग्रिम | जी | ४२,६३,३२,१४६ | | ६०,५६,०९,९०१ |
| विलंबित कर मत्ता | | १४,०९,४९,२८२ | | १४,६८,२०,२१९ |
| | | | **१७७,७३,६९,५४८** | **२००,३६,३८,६९०** |
| **उणे :** | | | | |
| चालू दायित्वे | एच | | ५०,५१,००,८४७ | ५०,१७,१५,१६८ |
| तरतुदी | | | २५,२४,८७,६३० | ४१,१९,८०,००० |
| निव्वळ चालू मत्ता | | | **१०१,९७,८७,०४४** | **१०८,९९,४३,५०४** |
| **प्रारभिक खर्च** | **आय** | | ० | २२,४८,७८२ |
| (निर्लेखित करण्याची शिल्लक) | | | | |
| **नफा व तोटा खाते** | | | ४३,३५,२७,३३९ | ३९,२४,१८,६९३ |
| | | | **१४८,०५,००,५७५** | **१५१,३२,४४,३४५** |
| **लेख्यावर संबंधित टिपण्या** | **क्यु** | | | |

आमच्या समदिनांकाच्या अहवालानुसार

**मे. एम. बी. अग्रवाल आणि कंपनी**

सनदी लेखापाल

फर्म क्र. १००१३७ डब्ल्यु.

भागीदार

सदस्य क्र. ४८२२९

**शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित करिता**

महाव्यवस्थापक (वित्त) व कंपनी सचिव

सह व्यवस्थापकीय संचालक

व्यवस्थापकीय संचालक

स्थळ - मुंबई

दिनांक - ०४ ऑक्टोंबर २०१०

# शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

## ३१ मार्च २००५ रोजी संपलेल्या वर्षाचा नफा व तोटा लेखा

| तपशिल | अनुसूची | चालू वर्ष | चालू वर्ष | मागील वर्ष |
|---|---|---|---|---|
| **प्राप्ती** | | | | |
| विक्री | जे | | १०,१६,०४,१७५ | ८,७८,११,१९५ |
| व्याजाची प्राप्ती | के | | ५,२५,००,१७७ | १०,१७,२९,९०१ |
| इतर प्राप्ती | एल | | २४,०९,८९१ | ५९,८७,२५२ |
| प्रकल्पांवरील तोटा प्रत्यावर्त | एम | | १५,८४,७५,७५० | २८,०७,४५,००० |
| | | | **३१,४९,८९,९९३** | **४७,६२,७३,३४८** |
| **खर्च** | | | | |
| चालू बांधकामे : प्रारभिक शिल्लक | डी | १०६,२७,९३,५३५ | | ४७,६२,७३,३४८ |
| अधिक : वर्षातील वृध्दी | | ८,६३,६४,६५९ | | १२०,०४,५९,६५२ |
| | | ११४,९१,५८,१९४ | | १४१,८०,१४,८६२ |
| उणे - चालू बांधकामे अखेरची शिल्लक | | १०१,११,४६,७४६ | | १०६,२७,९३,५३५ |
| | | | **१३,८०,११,४४८** | **१७,८५,२५,६४८** |
| कर्मचा-यांची प्रदाने | एन | | ७४,१५,७८२ | ८१,१६,४९४ |
| प्रशासकीय व इतर खर्च | ओ | | १६,८६,८९,६३१ | १,०७,०२,७६७ |
| वित्तीय खर्च | पी | | ३,५९,२०,४७२ | ९०,५८,६९८ |
| | | | **३५,००,३७,२८८** | **३८,३०,९९,२८६** |
| वर्षाकरिता नफा - तोटा | | | –३,५०,४७,२९५ | ९,३१,७४,०६२ |
| घसारा | | | १८,७७,२०१ | १८,०९,६९५ |
| करपूर्व नफा | | | **-३,६९,२४,४९६** | ९,१३,६४,३६७ |
| पूर्व कालीन खर्च | | | ० | ८३,६८१ |
| पूर्व कालीन प्राप्ती | | | १६,८६,७८६ | ४,२१,२७८ |
| वर्षाचा  निव्वळ नफा / तोटा | | | –३,५२,३७,७१० | ९,१७,०१,९६४ |
| कर तरतुद | | | ० | -६८,८०,००० |
| आयकर | | | ० | -१२,५८,११० |
| वजा - विलंबीत कर दायित्व / (विलंबित कर मत्ता) | | | –५८,७०,९३७ | -४,८२,६३,६०० |
| शिल्लक ताळेबंदात नेली | | | **-४,११,०८,६४७** | **३,५३,००,२५४** |

आमच्या समदिनांकाच्या अहवालानुसार

**मे. एम. बी. अग्रवाल आणि कंपनी**
सनदी लेखापाल
फर्म क्र. १००१३७ डब्ल्यु.
भागीदार
सदस्य क्र. ४८२२९

**शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित करिता**

महाव्यवस्थापक (वित्त) व कंपनी सचिव

सह व्यवस्थापकीय संचालक

व्यवस्थापकीय संचालक

स्थळ - मुंबई
दिनांक - ०४ ऑक्टोबर २०१०

# शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

## ३१ मार्च २००५ रोजीच्या ताळेबंदाशी निगडीत परिशिष्ट

| | ३१ मार्च २००५ रोजी असलेली रक्कम | ३१ मार्च २००४ रोजी असलेली रक्कम |
|---|---|---|
| **परिशिष्ट - ए - भाग भांडवल**<br>**अधिकृत**<br>प्रत्येकी र १०/- चे ६०,००,००,००० समभाग | ६००,००,००,००० | ६००,००,००,००० |
| | ६००,००,००,००० | **६००,००,००,०००** |
| **विक्रीस काढलेले अभिदत्त व भरणा झालेले भांडवल**<br>प्रत्येकी र १०/- प्रमाणे ११,५०,००,०८० समभागांचे भरणा केलेले | ११५,००,००,८०० | ११५,००,००,८०० |
| | **११५,००,००,८००** | **११५,००,००,८००** |
| **परिशिष्ट - बी - कर्ज**<br>**भारीत कर्ज -** हुडकोकडून कर्ज<br>(महाराष्ट्र शासनाने दिलेल्या हमीने भारीत) | २३,०४,९९,७७५ | २६,३२,४३,५४५ |
| **अभारित कर्ज -** झो. पु. प्रा. कडून कर्ज | १०,००,००,००० | ९,३२,००,००० |
| | **३३,०४,९९,७७५** | **३६,३२,४३,५४५** |

# शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

## ३१ मार्च २००५ रोजीच्या ताळेबंदाशी निगडीत परिशिष्ट

**परिशिष्ट -सी - स्थिर मत्ता**

| | | | ठोकळ मत्ता | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु क्र | मत्ताचे वर्णन | घसारा दर % | १.४.२००४ रोजी शिल्लक | वर्षातील वृध्दी | पूर्व वर्षाची दुरूस्ती | वर्षातील मत्ता विक्री | ३१.३.२००५ रोजी शिल्लक |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | कार्यालयीन साधनसामुग्री | ४.७५ | २,७५,१४९ | ५७,५५० | | | ३,३२,६९९ |
| २ | वातानुकुल यंत्र | ४.७५ | १९,६६,१७० | ० | | | १९,६६,१७० |
| ३ | संगणक | १६.२० | २९,६१,८९८ | ३,८४,९०६ | | | ३३,४६,८०४ |
| ४ | विद्युत जोडणी | ४.७५ | १३,३८,९२१ | ० | | | १३,३८,९२१ |
| ५ | विद्युत टंकलेखन यंत्र | ४.७५ | ९,००० | ० | | | ९,००० |
| ६ | अग्नीशमन सामुग्री | ४.७५ | १,६०,४०० | ० | | | १,६०,४०० |
| ७ | फर्निचर व खिळणी | ६.३३ | ६९,१५,६६० | ५५,६४८ | ० | | ६९,७१,३०८ |
| ८ | भ्रमण ध्वनी संच | ४.७५ | १,०१,६९९ | २७,५०० | | | १,२९,१९९ |
| ९ | फॅक्स यंत्र | ४.७५ | ९०,७०० | ० | | | ९०,७०० |
| १० | प्रशीतक व वातानुकुल | ६.३३ | ५३,०३६ | ० | | | ५३,०३६ |
| ११ | दूरध्वनी | ४.७५ | ३,७८,४२० | ० | | | ३,७८,४२० |
| १२ | समय नोंदक यत्र | ४.७५ | ८५,०२४ | ० | | | ८५,०२४ |
| १३ | वाहने | ९.५० | ४०,४०,३०३ | ० | | | ४०,४०,३०३ |
| १४ | दृकश्राव्य प्रक्षेपी | ४.७५ | ३,३६,६०० | ० | | | ३,३६,६०० |
| १५ | झेरॉक्स यंत्र | ४.७५ | २,४३,९८३ | ७८,६५० | | | ३,२२,६३३ |
| १६ | संक्रमण गाळे कार्यान्वित | १.६३ | १,६४,८६,६३५ | ० | | - | १,६४,८६,६३५ |
| १७ | इमारत | १.६३ | १४,५८,००० | ० | ० | | १,४८,००० |
| | **एकूण** | | **३,६९,०१,५९८** | **६,०४,२५४** | **०** | **०** | **३,७५,०५,८५२** |
| | **मागील कालीन एकूण** | | **३,६२,२८,१६२** | **७,०२,०३६** | **३१,२००** | **५९,८००** | **३,६९,०१,५९८** |

# शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

## ३१ मार्च २००५ रोजीच्या ताळेबंदाशी निगडीत परिशिष्ट

| घसारा | | | | | निव्वळ मत्ता | |
|---|---|---|---|---|---|---|
| १.४.२००४ रोजी शिल्लक | वर्षाकरिता घसारा | पूर्व वर्षाची दुरूस्ती | विक्रीत मत्तावरील घसारा | ३१.३.२००५ रोजी शिल्लक | ३१.०३.२००५ रोजी | ३१.३.२००४ रोजी |
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| ४०,२३७ | १५१२१ | | | ५५३५८ | २,७७,३४१ | २,३४,९१२ |
| ५१६,२३० | ९३३९३ | | | ६०९६२३ | १३,५६,५४७ | १४,४९,९४० |
| १७,८७,४४१ | ५१६८९२ | | | २३०४३३३ | १०,४२,४७१ | ११,७४,४५७ |
| ३,४४,०२४ | ६३,५९९ | | | ४,०७,६२३ | ९,३१,२९८ | ९,९४,८९७ |
| २,३०५ | ४२८ | | | २,७३३ | ६,२६७ | ६,६९५ |
| ४२,५८३ | ७,६१९ | | | ५०,२०२ | १,१०,१९८ | १,१७,८१७ |
| २२,८१,४०३ | ४,३९,९११ | ४३,६८० | | २७,६४,९९४ | ४२,०६,३१४ | ४६,३४,२५७ |
| २०,५५१ | ५,५१३ | | | २६,०६४ | १०३,१३५ | ८१,१४८ |
| २१,९६६ | ४,३०८ | | | २६,२७४ | ६४,४२६ | ६८,७३४ |
| १७,५०१ | ३,३५७ | | | २०,८५८ | ३२,१७८ | ३५,५३५ |
| ९२,६९९ | १७,९७५ | | | १,१०,६७४ | २,६७,७४६ | २,८५,७२१ |
| २१,९६२ | ४,०३९ | | | २६,००१ | ५९,०२३ | ६३,०६२ |
| १९,६७,०३७ | ३,८३,८२९ | (२८,११४) | | २३,२२,७५२ | १७,१७,५५१ | २०,७३,२६६ |
| ८६,६९० | १५,९९० | | | १,०२,६८० | २,३३,९१९ | २,४९,९१० |
| २९,६४३ | ११,५८९ | | | ४१,२३२ | २,८१,४०१ | २,१४,३४० |
| ७,८१,५०७ | २,६९,८७३ | २,४२,४२८ | | १२,९३,८०८ | १५१९२,८२७ | १,५७,०५,१२८ |
| १,२४,६८७ | १,४८,४५२ | | | १,४८,४५२ | १३०९,५४८ | १३,३३,३१३ |
| **८१,७८,४६६** | **१८,७७,२०१** | **२५७९९४** | **०** | **१,०३,१३,६६१** | **२,७१,९२,१९१** | **२,८७,२३,१३२** |
| **६६,९१,६९४** | **१८७०९,६९५** | **-३,०८,६७६** | **१४,२४७** | **८१,७८,४६६** | **२,८७,२३,१३२** | **२,९५,३६,४६८** |

# शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

## ३१ मार्च २००५ रोजीच्या ताळेबंदाशी निगडीत परिशिष्ट

परिशिष्ट - डी - कार्यान्वित प्रकल्प

| प्रकल्पाचे नांव | दिनांक १.४.२००४ ची शिल्लक | कालावधीतील वाढ | दिनांक ३१.३.२००५ ची शिल्लक | विक्रिजन्य प्रकल्पांचा परिव्यय | ३१.३.०५ रोजी कार्यान्वित प्रकल्पावर एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| ए.के.जी. नगर, ६० फुट, धारावी | १,३३,४२६ | | १,३३,४२६ | - | १,३३,४२६ |
| आंबेडकर नगर, धारावी | ७४,९८,४२२ | १६,८७५ | ७५,१५,२९७ | - | ७५,१५,२९७ |
| क्रॉस रोड, क्रमांक - २, धारावी | ८६,९४० | ० | ८६,९४० | - | ८६,९४० |
| सी. एस. क्रमांक ३४३ - धारावी | १४,५४,२६७ | ० | १४,५४,२६७ | - | १४,५४,२६७ |
| दौलत नगर, धारावी | १४,५४८ | ८,८७,७६५ | ९,०२,३१३ | - | ९,०२,३१३ |
| दिडोंशी प्रकल्प | ८२,७५,५३,९०१ | -२,९५,७२,३०८ | ७९,७९,८१,५९३ | | ७९,७९,८१,५९३ |
| माटूंगा लेबर कँप | ८,१५,४३,०२४ | १७,९६,७७३ | ८,३३,३९,७९७ | ५,२०,६७,५०१ | ३,१२,७२,२९६ |
| मानखूर्द प्रकल्प (२८-३३) | ५५,६९८ | ० | ५५,६९८ | - | ५५,६९८ |
| राहूल नगर प्रकल्प | २,१०,३०,७३९ | २,१०,५६,२६६ | ४,२०,८७,००५ | ० | ४,२०,८७,००५ |
| राजेंद्र प्रसाद नगर, (जमीन) | ० | ४,२६,००० | ४,२६,००० | | ४,२६,००० |
| शेड कॉम्प्लेक्स (बांधकाम) | ११,८४,७८,०३६ | ५७,०७,९३४ | १२,४१,८५,९७० | ० | १२,४१,८५,९७० |
| सिध्दार्थ नगर, धारावी | १,३६२ | ० | १,३६२ | - | १,३६२ |
| शिवम गृ. नि. सं. १८१, धारावी | ४,२४,४५१ | २३,७६१ | ४,४८,२१२ | - | ४,४८,२१२ |
| शिवशक्ती नगर, धारावी | २२,२०,१३५ | २३,१६१ | २२,४३,२९६ | | २२,४३,२९६ |
| सुभाष नगर, कुंभारवाडा | ८,७२,८८३ | | ८,७२,८८३ | - | ८,७२,८८३ |
| सुंदर नगर, अंधेरी | ३१,४२४ | | ३१,४२४ | - | ३१,४२४ |
| तुर्भे - मंडाले - मानखुर्द | ० | ८,२८,६८,००८ | ८,२८,६८,००८ | ८,२८,६८,००८ | ० |
| वल्लभ गृ. नि. सं. | १३,९४,२७९ | ५४,४८५ | १४,४८,७६४ | - | १४,४८,७६४ |
| वडाळा प्रकल्प | ० | २६,९८,१९३ | २६,९८,१९३ | २६,९८,१९३ | ० |
| सी. एस. ३१५, (पीटी) | | ३,७७,७४६ | ० | ३,७७,७४६ | ० |
| **एकूण** | **१,०६,२७,९३,५३५** | **८,६३,६४,६५९** | **१,१४,८७,८०,४४८** | **१३८०११४४८** | **१,०१,११,४६,७४६** |
| **मागील वर्ष** | **१२०,०४,५९,६५२** | **२१,७५,५५,२१०** | **१४१,८०,१४,८६२** | **३५,५२,२१,३२७** | **१०६,२७,९३,५३५** |

# शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

## ३१ मार्च २००५ रोजीच्या ताळेबंदाशी निगडीत परिशिष्ट

| तपशिल | दि. ०१.४.२००४ ते दि. ३१.०३.२००५ च्या वर्षाकरीता (रूपये) | दि. ०१.४.२००३ ते दि. ३१.०३.२००४ च्या वर्षाकरीता (रूपये) |
|---|---|---|
| **परिशिष्ट - इ - संक्रीर्ण ऋणको ( अप्रतिभूत पण उचित)** | | |
| ६ महिन्यापेक्षा अधिक कालावधीकरीता उर्वरित रक्कम | १४,९७,४२,३०० | १५,४५,२६,५०० |
| इतर | ६६,००,४५३ | ३४,६०,८०० |
| | **१५,६३,४२,७५३** | **१५,७९,८७,३००** |
| **परिशिष्ट - एफ - बँकेतील शिल्लक** | | |
| बँक ऑफ महाराष्ट्र १५७९९ ० | | ६५२ |
| बँक ऑफ महाराष्ट्र निलंबलेख खाते १५९५४ (दिडोंशी) १,९५,९६० | | १,९५,९६० |
| बँक ऑफ महाराष्ट्र निलंबलेख खाते १५९५५ (वडाळा) १,११,९६० | | १,११,९६० |
| बँक ऑफ महाराष्ट्र १५८१० २२,९०,७०१ | २५,९८,६२१ | ५१,१९,१६३ |
| मुदत ठेवी | ४,००,००,००० | **२,५०,००,०००** |
| | **४,२५,९८,६२१** | **३,०४,२७,७३५** |
| **परिशिष्ट - जी - कर्जे व अग्रीम** | | |
| विकासक कंत्राटदार आणि इतर कर्जे (विकासकांची कर्जे व त्यावरील व्याज प्रतिभूत व प्राप्य) | ३७,८८,६३,४१२ | ५५,७९,३८,९५७ |
| अग्रिम रक्कमा इतर भत्ता | ४,५२,०५,४५५ | ४,५४,१०,६६४ |
| मुदत ठेवी | २०,५८,२९२ | २०,५५,२९३ |
| म्हाडाकडून प्राप्य | २,०४,९८७ | २,०४,९८७ |
| | **४२,६३,३२,१४६** | **६०,५६,०९,९०१** |
| **परिशिष्ट - एच - चालू दायित्व व तरतूदी** | | |
| (अ) संक्रीर्ण ऋणको ९५,२१,८०१ | | १६,१८,२८,८०० |
| इतर दायित्वे ४९,५४,५८,७५० | | ४८,५४,९९,७८३ |
| अनामत ठेव १,२०,३२३ | ५०,५१,००,८७४ | ३२,६०३ |
| | **५०,५१,००,८७४** | **५०,१७,१५,१८६** |
| **(ब) तरतुदी** | | |
| प्रकल्पावरील तोटयाकरिता तरतूदी | २२,८९,७९,२५० | ३८,७४,५५,००० |
| आयकरासाठी तरतुदी | २,३५,०८,३८० | २,४५,२५,००० |
| | **२५,२४,८७,६३०** | **४१,१९,८०,०००** |
